**विषयः-** कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी
प्रतिबंधात्मक उपायोजनेच्या अनुषंगाने पारीत
केलेले आदेश, निर्देश इत्यादिचे
अंमलबजावणीबाबत..

## जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

क्र.२०२०/आपत्ती व्यवस्थापन कक्ष/टे-१/को./सीआर-
दि. १८/०३/२०२०

वाचाः-१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/२०२०/प्रक्र.५८/ आरोग्य-५ दि.१५.०३.२०२०.
२) साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ चे कलम २,३ व ४
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/ प्रक्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च, २०२०.
४) या कार्यालयाचे आदेश /निर्देश/परिपत्रक क्र. २०२०/आरबी-१/डे-२/टे-४/सिआर दि.१५.०३.२०२०, दि.१६.०३.२०२०,दि.१७.०३.२०२० व दि.१८.०३.२०२०.

**आदेशः-**

ज्याअर्थी संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे.

त्यामुळे साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ मधील तरतुदीनुसार संबंधित जिल्हाधिकारी यांना उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी संक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे. त्या अनुषंगाने नांदेड जिल्हयात कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी खालील नमुद विषयानुसार आदेश /निर्देश/परिपत्रक निर्गमित केले आहे.

याव्दारे शहरी भागासाठी उपविभागीय दंडाधिकारी,सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, यांचे अधिनस्त संयुक्त पथक घठीत करुन त्यामध्ये सर्व तहसिलदार, पोलीस निरीक्षक, तसेच, महानगरपालिकाचे उपायुक्त, नगरपालिका/ नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांचा समावेश करुन निर्देशित करण्यात येते की, खालील विषयानुसार निर्गत उपायोजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी होत आहे किंवा कसे याबाबत विविध ठिकाणी अचानकपणे भेट देवून पहाणी करावी अशा पहाणीमध्ये कोणतीही व्यक्ती, संस्था अथवा संघटना यांनी दिलेल्या निर्देशाचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्या विरुध्द भारतीय दंडसंहिता कलम १८८ नुसार दंडनिय /कायदेशिर कारवाई करावी. यामध्ये उपविभागीय दंडाधिकारी यांनी आवश्यकतेनुसार अधिकारी/कर्मचारी यांचा पथकात समावेश करावा.

तसेच, ग्रामीण भागासाठी उपविभागीय दंडाधिकारी व उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी वरील निर्देशानुसार तपासणी कामी त्यांचे स्तरावरुन आवश्यकतेनुसार त्यांच्या कार्यक्षेत्रातील इतर विभागातील अधिकारी/कर्मचारी यांची सेवा महाराष्ट्र कोव्हीड-१९ उपायोजना नियम २०२० मधील कलम १० नुसार अधिगृहीत करुन पहाणी पथके गठीत करावी. व तसे आदेश त्यांचे स्तरावरुन निर्गमित करावीत.

तसेच या कामात कोणत्याही अधिकारी/कर्मचारी यांच्या कडून कुचराई/दिरंगाई केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचे विरुध्द महाराष्ट्र कोव्हीड -१९ उपायोजना नियम २०२० मधील तरतुद व आपत्ती व्यवस्थापना अधिनियम २००५ च्या कलम ५१ व इतर अनुषंगिक कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

| अ.क्र. | पत्र/आदेश दिनांक | विषय |
|---|---|---|
| १ | १५.०३.२०२० | नांदेड जिल्हयात सामाजिक, सांस्कृतीक, राजकीय, धार्मिक, क्रिडा विषयक कार्यक्रमांना पुढील आदेश होईपर्यंत प्रतिबंध |
| २ | १५.०३.२०२० | शाळा /महाविद्यालय/ शैक्षणिक संस्था बंद ठेवणेबाबत |
| ३ | १५.०३.२०२० | खाजगी शिकवणी (Coaching Classes ) व अभ्यासिका केंद्र बंद ठेवणेबाबत. |
| ४ | १५.०३.२०२० | शहरी हद्दी लगतच्या शैक्षणिक संस्था बंद ठेवणेबाबत |
| ५ | १६.०३.२०२० | नांदेड जिल्हयातील ग्रामीण भागातील सर्व शासकीय व खाजगी शैक्षणिक संस्था बंद ठेवणेबाबत |
| ६ | १५.०३.२०२० | महानगरपालिका व सर्व नगरपालिका, सर्व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी आंगणवाडया बंद ठेवावे |
| ७ | १५.०३.२०२० | चित्रपटगृहे, तरणतलाव, व्यायामशाळा, नाटयगृह, म्युझियम बंद ठेवणेबाबत. |
| ८ | १५.०३.२०२० | शॉपिंग मॉल बंद करणेबाबत |
| ९ | १६.०३.२०२० | आठवडीबाजार बंद करणेबाबत. |
| १० | १६.०३.२०२० | कार्यालयात बैठका व अभ्यांगतांच्या भेटी नियंत्रीत करणे बाबत |
| ११ | १७.०३.२०२० | नांदेड जिल्हयातील ग्रामीण क्षेत्रातील आंगणवाडया ठेवणेबाबत. |
| १२ | १७.०३.२०२० | बँक, पोस्ट ऑफीस व एटीएम मधील ग्राहकांची गर्दी नियंत्रित करणेबाबत |
| १३ | १७.०३.२०२० | आधार केंद्र बंद ठेवणेबाबत |

| | | |
|---|---|---|
| १४ | १७.०३.२०२० | सर्व धार्मिक स्थळावरील भाविकांची गर्दी नियंत्रित करणेबाबत |
| १५ | १७.०३.२०२० | तुर/चना/कापुस खरेदी केंद्रावरील नागरीकांची गर्दी नियंत्रित करणेबाबत |
| १६ | १८.०३.२०२० | सर्व प्रकारचे हॉटेल, परमिटरुम, बेकरी, स्वीटमार्ट, चाट भंडार, धाबा इत्यादी ठिकाणची गर्दी नियंत्रित करणेबाबत. |
| १७ | १८.०३.२०२० | दुय्यम निबंधक कार्यालयात येणारे खरेदी/ विक्रीदार यांची गर्दी नियंत्रीत करणे बाबत |

स्वाक्षरीत/-
**(विजय मगर)**भा.पो.से.
**पोलीस अधीक्षक तथा सदस्य**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

स्वाक्षरीत/-
**(डॉ. विपीन इटनकर)** भा.प्र.से.
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

**प्रतिलीपी माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
२) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद
३) मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र, नांदेड

**प्रत, सर्व संबंधितांना अनुपालनास्तव**

**पोलीस अधीक्षक तथा सदस्य**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**